## " शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांचे शैक्षणिक योगदान मोठे आहे. "

**मा. सागर देशपांडे , संपादक जडणघडण**

कोल्हापूर दि.8 : " शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांनी आपल्या शैक्षणिक कार्यातून खेडयापाडयातील गोरगरीबांच्या मुलांना शिक्षण देण्याचे महान कार्य केलेले आहे . या बापूजींच्या शैक्षणिक कार्याची शासन स्तरावरील राजसत्तेने व समाजाने जेवढी दखल घ्यायला हवी होती तेवढी घेतली नाही. विवेकानंद शिक्षण संस्थेचा शाखा विस्तार व बापूजींच्या शैक्षणिक कार्याची गुणवत्ता पाहून या संस्थेचे एक स्वतंत्र विद्यापीठ निर्माण व्हायला हवे. " असे विचार शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ३० व्या स्मृतिदिन समारंभात मा.श्री. सागर देशपांडे , संपादक जडणघडण , यांनी ' **शिक्षण व्यवस्थेसमोरील आव्हाने** ' या विषयावर बोलताना काढले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते.

आपल्या भाषणातून मा.सागर देशपांडे यांनी आजची ग्रामीण व शहरी भागात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विविध समस्यांचा आढावा घेतला व या शिक्षणपध्दतीमध्ये नवतंत्रज्ञान , विज्ञान आणि नव्या अभ्यासक्रमाना संधी दिली पाहिजे. असे विचार व्यक्त केले. आजची शैक्षणिक परिस्थिती बदलत आहे. सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ बदलत आहेत. अशावेळी शिक्षकाची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. बापूजींनी शिक्षण शाखांना संस्कार केंद्रे म्हटले व शिक्षकांना गुरुदेव म्हटले. उच्चत्तम संस्कारमूल्ये शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये रुजविणे अत्यंत आवश्यक आहे. तरच भावी पिढी ही अधिक प्रगतीशील व गतिमान बनेल असे विचार त्यांनी व्यक्त केले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांच्या जीवनातील अनेक प्रसंगाची आठवण करुन देत त्यांनी उभ्या केलेल्या शाखा व कार्यांबद्दल माहिती दिली. बापूजी हे ध्येयवादी , प्रज्ञावान शिक्षक व सक्रिय गुरुदेव कार्यकर्ते होते. त्यांनी उभी केलेली विवेकानंद शिक्षण संस्था संस्काररुपी ज्ञानमंदिराच्या पायावर सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रीय एकात्मता जपणारी आहे.

संस्थेच्या सचिवा मा. प्राचार्या सौ.शुभांगी गावडे यांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी अत्यंत कष्टातून या संस्थेची उभारणी केली आहे. या संस्थेच्या कार्यामध्ये सर्व विद्याथी व गुरुदेव कार्यकर्ते यांचे योगदान फार मोठे आहे. असे विचार आभार व्यक्त करताना मांडले.

सुरुवातीला प्रमुख पाहुण्यांनी व संस्था पदाधिकारी यांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे व संस्थामाता श्रीमती सुशीलादेवी साळुंखे यांच्या समाधीचे दर्शन घेऊन पुष्पचक्र अर्पण केले. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजन व संस्थेच्या प्रार्थनागीताने करण्यात आली. यावेळी श्री महेश हिरेमठ व त्यांच्या साथीदारांनी भावपूर्ण भक्तिगीते व भावगीते सादर करुन सर्वांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे सहसचिव मा. प्राचार्य डॉ आर व्ही शेजवळ यांनी केले. पाहुण्यांची ओळख विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस्. वाय. होनगेकर यांनी करुन दिली.

यावेळी पाहुण्यांच्या हस्ते संस्थेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करणेत आला.तसेच याप्रसंगी विवेकानंद कॉलेजच्या विवेक न्यूज अंकाचे प्रकाशन , संस्थेची निकाल संकलन पुस्तिका, संस्था मूल्यांकन पुस्तिका, वार्षिक नियोजन पुस्तिका इत्यादी पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. सूत्रसंचालन प्रा डॉ प्रभावती पाटील , प्रा.समिक्षा फराकटे, यानी केले. या प्रसंगी संस्थेचे सहसचिव प्राचार्य पी. एस. चव्हाण, डॉ. शरदचंद्र साळुंखे तसेच संस्था पदाधिकारी, विविध शाखांचे प्राचार्य, मुख्याध्यापक, गुरुदेव कार्यकर्ते व विद्यार्थी , विद्यार्थिनीं बहुसंख्येने उपस्थित होते.

---

**विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर**

जा.क्र.व्हीसीके/ 816 /2017-18 दिनांक : 08.08.2017

प्रति,

मा. संपादकसो,

दैनिक ------------------------- कोल्हापूर .

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात फोटोसह प्रसिध्द करुन सहकार्य करावे ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू ,

(डॉ. एस. वाय. होनगेकर )

प्राचार्य

विवेकानंद कॉलेज

कोल्हापूर